प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑगस्ट 16, 2016

**श्री दादासाहेब गजमल सहकारी बँक लि, पाचोरा, जिल्हा : जळगाव हयांना आरबीआयकडून दंड आकारणी**

बँकिंग विनियम अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46 (4) सह वाचित कलम 47 अ(1)(ब) खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, श्री दादासाहेब गजमल सहकारी बँक लि., पाचोरा, जिल्हा जळगाव हयांना रु.1.00 लाख (रुपये एक लाख) दंड लावला आहे. आणि हा दंड, रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी न घेता, बँकेच्या ॲसेट्सवर फ्लोटिंग चार्ज निर्माण करण्याबाबत आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे हयांचे उल्लंघन केल्याबाबत लावण्यात आला आहे.

रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने लेखी उत्तर देऊन मौखिक सादरीकरणही केले होते. हया प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँक हया निष्कर्षावर आली की उल्लंघने निश्चितपणे झाली असून दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/419**